MAHARASHTRA MANDAL CHICAGO
ESTABLISHED 1969
रचना
महाराष्ट्र मंडळ शिकागो
महाराष्ट्र मंडळ शिकागो
गणेशोत्सव
गणपती बाप्पा मोरया
अंक ३
भाद्रपद
शके १९४२
ऑगस्ट
२०२०

**Best**

**Compliments**

## Contact us for all your Real Estate needs!

**Buying, Selling and Investing!**

In all suburbs and Chicago downtown area.

**We offer a special discount and quality service at every step!**

Detailed comparative market analysis to buy or sell your property:

- Primary Home
- Investment properties
- Multi-family homes
- Rental properties
- Commercial properties

We help with home staging, and the supporting network of Licensed Inspectors, Attorneys, Mortgage Brokers, & Handyman.

Call us for a free market evaluation of your property!

Sangeeta Chavan
Real Estate Broker
630-728-4871
Sangeeta_chavan@yahoo.com

Hemant Chavan
Real Estate Broker
630-660-6231
hxchavan@yahoo.com

Perfect Properties Inc.
2712 Forgue Dr, #118,
Naperville, IL 60564

# २०२० गणेशोत्स्तव विशेषांक अनुक्रमणिका


अध्यक्षीय..... समीर सावंत

मी 'डॉक'बोलतोय..... रश्मी चाफेकर

देवा श्रीगणेशा..... अभिजित रायरीकर

स्त्री हक्क ..... प्रिया पाटणकर

Practical Lessons from Ganesha Festival..... अमित चव्हाण

"एक आगळा स्नेह"..... लीना घारपुरे

२०२० - सप्टेंबर ते जानेवारी दिनदर्शिका ..... वर्षा विसाळ

पंडित जसराज जी यांना निरोप..... रवी बामणे

कृतज्ञता..... विजय मुळीक

शब्दकोडे..... अभिजित रायरीकर

कमलः कमलात् जातः ..... डॉ. सुभाष वाईकर

APARTMENT LIVING AS AN ABCD..... अनुश्री रायरीकर

मनातले का..... श्री रामचंद्र अळकुटकर

बाप्पाशी गप्पा ..... सौ सुलक्षणा कुलकर्णी

Paneer Do Pyaza..... मधुरा जोशी

Vegan Chil..... सावनी नगरकर

शब्दकोडे – उत्तर ..... अभिजित रायरीकर

रहे ना रहे हम..... प्रसन्न जोगळेकर

Maharashtra Mandal Chicago Inc.
(Year of Establishment: 1969)
The first Maharashtra Mandal in United States of America, serving the community as non-profit organization
Website: https://www.mahamandalchicago.org
Email Address for correspondence:
president@mahamandalchicago.org
secretary@mahamandalchicago.org
karyakarini@mahamandalchicago.org

**सह संपादक: अभिजित रायरीकर**

**मांडणी आणि संकलन सहाय्य: आशिष नगरकर**

**मुखपृष्ठ: अमोल श्रीपाल**

**मुद्रित शोधन: डॉ. सुजाता महाजन**

**मुद्रक: मायक्रोप्रिंट**

साहित्य / मजकूर पाठविण्यासाठी संपर्क:

**Rachana@mahamandalchicago.org**

**Ulka.nagarkar@yahoo.com**

रचना संपादक:
उल्का नगरकर



महाराष्ट्र मंडळ शिकागो ( MMC) बद्दल काही उल्लेखनीय नोंदी :

- It is the first Maharashtra mandal in the United States of America, serving the local community as a non profit organization, since 1969
- It is the proud founder of (BMM) Bruhan Maharashtra Mandal, North America: http://www.bmmonline.org/
It is also the initiator of BMM newsletter – BMM Vrutta: http://www.bmmonline.org/vruttaarchives
- To review Objectives and Constitution of MMC

## अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,

गणपती बाप्पा मोरया!!

ऑगस्ट महिना आला की आपोआप मन गणेश चतुर्थीच्या आगमनाकडे वळू लागतं. श्वासात उदबत्तीचा सुगंध, जिभेवर उकडीच्या मोदकाची चव आणि ओठावर आपोआपच 'सुखकर्ता दुःखहर्ता' ची चाल नाचू लागते. घराघरात दर वर्षी जशी तयारी केली जाते तशीच आपल्या मंडळाच्या गणपतीची तयारी त्याच जोमानें आणि उत्साहाने कार्यकर्ते एकत्र येऊन "गणपती बाप्पा मोरया" म्हणत करतात.

या वर्षी मात्र मंडळाचा गणेश चतुर्थी कार्यक्रम एका वेगळ्या प्रकारे करण्याचा योग आला. सद्य परिस्थितीत मोठ्या संख्येने एकत्र जमण्यावर निर्बंध असल्यामुळे आणि आपल्या सदस्यांच्या व कार्यकर्त्यांच्या आरोग्याचा विचार करता, कार्य़कारिणीने ह्या वर्षी मंडळाचा गणपती **virtual** पध्दतीने करायचं ठरवलं. गणपतीचे आगमन, स्थापना, आरती आणि विसर्जन जास्तीत जास्त भाविकांपर्यंत पोहचावे म्हणून **online** उपलब्ध केले.

वर्षांच्या सुरवातीला ज्या जोमानें सर्व कार्यकर्त्यांचे साहाय्य लाभले, तो हुरूप पुन्हा एकदा दिसू लागला आणि प्रत्यक्ष नाही पण सर्वांच्या अदृश्य हातांनी केलेल्या मदतीनें हा सोहळा यशस्वी झाला. कार्य सिद्धीस नेण्यास 'श्री' समर्थ आहेतच, पण त्याशिवाय ज्यांनी अथक परिश्रम घेतले व दृष्टिआड राहून मदत केली त्या सर्व कार्यकर्त्यांचे, प्रायोजकांचे आणि देणगीदारांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

विघ्नहर्त्याकडे हीच एक प्रार्थना - सर्वांचे आरोग्य चांगले राहो आणि कॉरोनाची पीडा लवकर टळो!

समीर सावंत

## कार्यकारिणी

| | |
|---|---|
| <br>**President: Sameer Sawant**<br>President@mahamandalchicago.org | Chicagoland resident for over 19yrs with active participation in MMC since 2006. Treasurer for 2015 MMC Karyakarni, VP for 2018 MMC. Enjoys bringing the community together during festive occasions that stitches the fabric of tradition, custom and culture. |
| <br>**Vice President: Kavita Mundle**<br>karyakarini@mahamandalchicago.org | Chicago resident for over 25 years. Actively involved with MMC and BMM since 2011. GJC Food Committee chair, 2019 Looking forward to promoting MMC activities, our culture, and traditions through entertaining programs and delectable food throughout the year. |
| <br>**Vice President: Ramdas Thatte**<br>karyakarini@mahamandalchicago.org | Lives in Chicago area for last 26 years. Actively involved in MMC for many years. Looking forward to working with the Committee members to help build stronger community and friendships |
| <br>**Treasurer: Rahul Thatte**<br>treasurer@mahamandalchicago.org | Chicago area resident for over 20 years. Have been actively participating in clubs and community organizations from high school days in Schaumburg, to being a university student club president and MMC volunteer and now a treasurer. Looking forward to foster our culture, increase collaboration and to develop and promote friendship within and beyond. |
| <br>**Secretary: Bharat Naik**<br>karyakarini@mahamandalchicago.org | Resident of the Chicago-land area for over 24 years. Volunteered for MMC over the past several years. Has a goal to increase the spread of Marathi culture and language. Look forward to working with the team and bringing together the community for high quality programs. |

## कार्यकारिणी

| | |
|---|---|
| <br>**Board Member: Amit Rogye**<br>karyakarini@mahamandalchicago.org | Lives in Chicago area for last 7 years. Actively involved in MMC for last few years. Looking forward to working with everyone to bring the good programs and build stronger community |
| <br>**Board Member: Ratnangi Malpekar**<br>karyakarini@mahamandalchicago.org | Have been living in Chicago for last 13 years and this is 5th consecutive year in volunteering for Maharashtra Mandal of Chicago. Has an objective to widespread our Maharashtrian culture in chicagoland and strengthen our Marathi community. |
| <br>**Board Member: Abhijit Rayrikar**<br>karyakarini@mahamandalchicago.org | Naperville based IT professional involved with Maharashtra Mandal activities for over 15 years. Regularly writes in Rachana and likes music, travel and hiking. |
| <br>**Board Member: Dhanajay Kale**<br>karyakarini@mahamandalchicago.org | Resident of the Chicagoland area for over 25+ years. Enjoys watching Marathi programs and has volunteered for MMC over the several years to help bring quality programs to the Marathi audience. Look forward to working with the team and bringing together the community for high quality programs. |
| <br>**Board Member: Ravi Bamne**<br>karyakarini@mahamandalchicago.org | Living in Chicago for last 21 years. Actively involved in MMC and other communities for many years. Looking forward to bringing the Marathi community together. |

## LIAISONS

| Role | Members |
|---|---|
| MMC Trustees | Ashish Nagarkar, Ravi Joshi, Vaishali Raje, Pankaj Akolkar, Varsha Visal |
| BMM President | Vidya Joshi |
| BMM Trustee | Niteen Joshi |
| Community Outreach | Varsha Visal |
| MMC Shala Coordinator | Sulakshana Kulkani |
| Investment Committee | Sandeep Bag, Sandeep Raje |
| Advisor | Miling Joglekar |

## VOLUNTEERS

Amol Patil, Anagha Deshpande, Anand Dighe, Aniket Sawant, Aniruddha Sumant, Anupama Buzruk, Aparna Kesarkar, Archana Paranjape, Ashish Nagarkar, Bharati Velankar, Chinmay Dhawle, Deepa Bhimanwar, Deepali Kale, Gaurav Samant, Girish Patankar, Gaurav Harshe, Harshada Sawant, Hemant Chavan, Jaydeep Buzruk, Kalpana Nimkar, Kashmira Magar, Leena Vaidya, Mandar Pitre, Manik Gosavi, Mandar Joglekar, Milind Joglekar, Milind Velankar, Monica Patankar, Mrinal Joglekar, Nagesh Paranjape, Netaji Nikam, Nilesh Malpekar, Pankaj Akolkar, Prasanna Joglekar, Prasad Athanikar, Prasad Naik, Priyanka Parikh, Ravi Joshi, Ruchi Bamne, Sandeep Gadgil, Sangeeta Chavan, Sanjeev Kulkarni, Sampada Thatte, Sarita Salgaonkar, Sandeep Salgaonkar, Shreedhar Joshi, Sheetal Deshpande, Shilpa Naik, Shipra Athanikar, Shruti Rogye, Shubhangi Sumant, Shukla Joshi, Sucheta Akolkar, Suhas Gosavi, Sulakshana Kulkarni, Sunil Dev, Sunil Mundle, Suparna Thatte, Supriya Joshi, Swati Rayarikar, Tina Kande, Ulka Nagarkar, Vaibhav Shringarpure, Vaishali Dev, Vaishali Dhande, Vaishali Gadgil, Vaishali Raje, Varsha Bag, Varsha Visal, Vedashree Naik, Vidya Joshi, Vivek Magar, Vrinda More, Aparna, Kalpana Godse, Priya Patankar, Radha Godambe, Rashmi Chaphekar

## YOUTH VOLUNTEERS

Anish Khot, Ayush Khot, Anusha Thatte, Anushree Pitre, Aarchi Damle, Ariana D'Silva, Aryan Rogye, Meehika Joshi, Mahika Parekh, Suchir Sumant, Rajas Visal, Tejas Visal, Shree Damle, Soumil Naik, Soujas Patil

## मी 'डॉक'बोलतोय

नमस्कार. माझं नाव 'डॉक'. मी आहे एक कुत्र्याचं पिल्लू! मी शिकागोत राहतो. म्हणजे मी मूळचा इथला नाही पण माझ्या सुदैवाने एका ॲनिमल शेल्टरने मला इथे आणलं नाहीतर माझं काय झालं असतं कुणास ठाऊक? त्या कल्पनेने सुद्धा माझ्या अंगावरची फर उभी राहते. असो.

तर शिकागोत आल्यानंतर काही दिवस मी माझ्या भावांबरोबर त्या ॲनिमल शेल्टर / अडॉप्शन सेंटरमध्येच होतो. आम्हाला बघायला माणसं नेहमीच येत होती, शनिवार - रविवार तर खूपच गर्दी! लहान मुलांचं आमच्याशी खेळणं, आम्हाला घरी घेऊन जाण्यासाठी हट्ट करणं, आम्हाला आवडायचं, पण त्यातून नेहमीच काही निष्पन्न व्हायचं असं नाही. शेल्टरमध्ये आमची चांगली काळजी घेतली जात होती तरीसुद्धा त्या एव्हढ्याश्या क्रेटमधे आम्ही तिघं, तिथेच खाणंपिणं, अडचण व्हायची. पण आमची तक्रार नव्हती कारण त्यांनी आम्हाला वाचवलं होतं.

पण एकदा काय झालं, एक कुटुंब शेल्टरमध्ये आलं. बाबा आणि दोन छान मुली. मला ते कुटुंब आवडलं होतं. पण ते सगळे आमच्याच एका मैत्रिणीकडे बघत होते. बहुतेक आमची मैत्रीण त्यांना आवडली असावी. ह्या भेटीत मला मुलींची आई दिसली नाही. पण बाबा आणि मुली थोडा वेळ थांबून निघून गेले. दुसऱ्या दिवशी पुन्हा तेच कुटुंब दिसलं. पण आज आई बरोबर होती. आईने मैत्रिणीकडे १-२ मिनिटं पाहिलं आणि मग तिचं माझ्याकडे लक्ष गेलं आणि म्हणतात ना, "रेस्ट इज हिस्टरी" तसंच झालं आणि मी त्यांचा झालो, माझं नावही बदललं. ही एक गोष्ट फार बरी झाली, अहो कारण माझं आधीच नाव 'शेम्प' होतं. पण आता मी 'डॉक' झालो. आता मला अगदी संपूर्ण नाव आहे म्हणजे वडिलांच नाव, आडनावासकट! पण ते सगळं मी इथे सांगू शकत नाही (सिक्युरिटी रिझन्स).

तर आता मला खरंखुरं घर मिळालं. आमच्या घरात आई, बाबा आणि दोन बहिणी आहेत.

हो, ही सगळी माणसं आणि मी. मी ह्यांना आई, बाबा आणि ताई असंच म्हणतो. घरात माझे खूप लाड होतात. कधी कधी मी ऐकत नाही आणि मग रागावूनही घेतो. पण मी आहे फक्त एक वर्षाचा, मग तुमच्या लहान मुलांसारखी मी पण मस्ती करणारच ना? पण मी हळूहळू शिकतोय. माझं नाव घेतल्यावर मी बघतो, हे सगळे जेवायला बसले, की मी माझ्या जागेवर जाऊन बसतो, मला बाहेर जायचं असेल, की मी बेल वाजवतो. आईने देवाजवळ दिवा लावला, की मी नमस्कार करतो. मला खायला खूप आवडतं, मी सगळं खातो.

मला वॉकला जायला आवडतं, मी आणि आई आठवड्यातून ३-४ वेळा तरी जातो.

आणि आज वॉकला गेलेलो असताना मला हे सगळं सुचलं.

आता तुम्ही म्हणाल, की तू आत्मचरित्र का लिहीत नाहीस? अहो, मी एकच वर्षाचा आहे ना? मग आत्मचरित्र लिहिण्याएव्हढं मटिरियल माझ्याकडे कसं असणार? म्हणून मी हा छोटासा लेख लिहायचं ठरवलं. तुम्हाला कसा वाटला ते माझ्या आईला सांगा, ती मला सांगेल. बाय!

रश्मी चाफेकर

## देवा श्रीगणेशा

बाप्पा मोरया आला आहेस तू फक्त दहा दिवसांसाठी
इतक्याश्या वेळात होतील कशा सगळ्यांशी भेटीगाठी?
येताना उबर करून ये, पत्ता शोधायला नको आडकाठी
अमेरिकेत कसे कळणार लोकांना उंदीरमामाचे मराठी?

गणराया विद्येचा देवता आहेस अशी तुझी जगभर ख्याती
खरं सांग डोक्यात तुझ्या नक्की जागा आहे तरी किती?
कंप्यूटर किंवा मोबाईल दिसत नाही तुझ्या अवतीभोवती
कशी भरलीस डोक्यात तू इंटरनेटवरची सगळी माहिती?

आम्हाला दहा दिवस खिरापत व मोदकाचे जेवण पचते
कारण मंडळांचे देखावे बघत आम्ही गावभर फिरतो नुसते
लंबोदरा मोदक खाऊन तुझे मात्र पोट वाढलेले दिसते
बहुतेक स्वर्गात दिक्षित दिवेकर सारखे का कोणी नसते?

तुझ्या परतीच्या मिरवणुकीचे आता वाजताहेत ढोल सारे
त्यात लाऊडस्पीकरच्या ढणढणाटाने कान झालेत बहिरे
अरे तुझ्या सहवासात दहा दिवस फारच पटकन गेले खरे
पुढच्या वर्षी लवकर येऊन जास्त दिवस थांबशील का रे?

अभिजित रायरीकर

## स्त्री हक्क

स्त्री समानता आणि स्त्री मुक्ती चळवळ ह्या चळवळी तशा बरीच वर्षे चालू आहेत; अगदी १८५० च्या सुमारास स्त्रीशिक्षणासाठी झालेल्या चळवळीच्या आधीपासून म्हणायला हरकत नाही. ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी त्या छोट्या प्रमाणात चाललेल्या चळवळीला मोठे आणि महत्वाचे स्वरूप दिले हे नक्की.

कुठल्याही चांगल्या मोहिमेची सुरुवात ही किती आनंदाची गोष्ट असते ना? पण इथे स्त्री समानता ह्या माणसाच्या मूलभूत हक्कासाठीचा लढा करावा लागतोय ही अगदी खेदाची गोष्ट आहे.

स्त्री शिक्षण, सती, बालविवाहामुळे होणारे स्त्रीचे शोषण बंद करण्यासाठी विवाह करणाऱ्यांच्या वयाचे कायदे, विधवा स्त्रीचे केशवपन, परित्यक्तेचे हक्क असे बरेच विषय होते आणि मूलभूत हक्क होते ज्यांसाठी स्त्री आणि पुरुषांनी देखील मोठा लढा दिला, आणि खूप बदलही घडवून आणले.

२१ व्या शतकात पण काही समाजाला फायद्याचे विषय आणि रूढी दिसून येतात. हुंडा, एखाद्या विवाहात मुलं बाळ नसतील तर स्त्रीलाच कारणीभूत ठरवणे, स्त्रीचा चाकरासारखा वापर, घरात सुनेला द्वितीय नागरिकत्व देऊन तिचे शोषण करणे हे सगळे जरी सर्व घरात होत नसले तरी त्याचा काही प्रमाणात संचार सर्व आर्थिक, सामाजिक, शिक्षित आणि अशिक्षित स्तरांवर दिसून येतो.

आजही स्त्री समानतेसाठी चळवळ आणि स्त्रीच्या मूलभूत हक्का साठी आंदोलन संघर्ष करावा लागतोय ही तर केवळ खेदाचीच नव्हे तर निराशाजनक परिस्थिती आहे.

काही दिवसांपूर्वी एक नाटक पाहिले, क्वारंटाईनमुळे ऑनलाईन पाहिले. अतिशय कसलेल्या कलाकार पडदयावर आणि तितकेच उत्कृष्ट कलाकार पडदयामागे होते. विषय होता, समाजात स्त्रीला मिळणारी दुटप्पी वागणूक आणि त्याच स्त्रीने समाजाला न जुमानता आपल्या आनंदाला दिलेले महत्व. स्त्री हक्क जागृतीचे काही नवे आणि जुने विषय दोन्ही खूप छान हाताळले होते.

समाजाला अशा विषयांवर कलेतून सकारात्मक संदेश देणे, ही आज काळाची गरज आहे. त्यामुळे सर्व विषय चर्चेत येतात, त्यावर समाज तोडगा काढतो आणि निर्मूलन करू शकतो.

आताच्या काळात स्त्री नोकरी, कामानिमित्त बाहेर पडलीय, आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र आहे. तरी आजही स्त्री शोषण दिसून येते, सर्व आर्थिक आणि सामाजिक स्तरातील स्त्रियांना हे लहान मोठ्या प्रमाणात सहन करावे लागते. एकूण पुरुषप्रधान समाज रचना आणि पितृप्रधान समाज असल्यामुळे हे जास्त दिसून येते.

हल्ली प्रकर्षाने दिसून येतंय, की स्त्री स्वतः आपल्यासाठी बदल घडवून आणत आहे, एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला मदत करते आहे, मानसिक आधार देते आहे, स्त्री आपल्या आनंदासाठी लढतांना समाज आणि परिवार ह्यांनी आखलेल्या परिसीमेच्या बाहेर जायला घाबरत नाहीये, मुख्य म्हणजे ती अबला आणि दुःखी वगैरे नसून असलेल्या परिस्थितीला सामर्थ्याने तोंड देतेय.

स्त्रीला समाजात सुरक्षित वाटणे, तिला नोकरीत समान संधी आणि पगार मिळणे, सर्व आर्थिक आणि सामाजिक स्तरातील स्त्रियांना समान वागणूक साध्य करण्यासाठी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे पण होणारे बदल बघून हे ध्येय गाठले जाणार अशी आशा आहे. समाजातल्या प्रत्येकाला त्यासाठी मानसिकता बदलणे गरजेचे आहे आणि सर्व मनुष्य जातीला समान वागणूक आणि आनंदाने, स्वतंत्रपणे जगण्याचा हक्क मिळायला पाहिजे.

प्रिया पाटणकर

## Practical Lessons from Ganesha Festival

Let's analyze the Ganesha festival. It's really great that we celebrate the festival and come together but along with that I strongly feel that we should not miss the real essence of it. If we closely observe, Ganesha Festival is celebrated in three prime stages. 1. Srijan (Creation) 2. Poojan (Devotion) 3. Visarjan (Immersion)

**1. Srijan (Creation)**

Ganesha's Idol is created from clay, but the interesting thing to be noticed here is the idol is never worshipped in the shop. It is worshipped only after Prana Pratistha. Prana means life force, breath.

The Sanskrit word pratiṣṭhā, which in general usage means "resting" or "position", used in connection with a murti is translated by Apte as "the consecration of an idol or image. Well, it is a rite or ceremony by which a murti (image of a god) is consecrated at houses or pandals. Wherein hymns and mantras are recited to invite the deity to be resident guest, and the idol's eye is opened for the first time.

**Practical Lesson -** Only to be born as humans will not make us Human.

We can call it the Human body, but to be known as Human, we need to establish human values in ourselves.

We can say that if it is a stage of self-realization then only we will be praised and considered as Human beings.

**2. Poojan (Devotion)**

The devotion of Lord Ganesha is done in various forms, someone offers Lord Ganesha's favorite food to him, someone does Aarti day and night, someone recites and chants mantras, someone demands something to almighty and so on... As Per the 7th Chapter of Bhagwat Geeta, Bhagwan Shri Krishna categories 4 types of Devotees

a. Who pray for worldly achievements
b. Who pray out of fear
c. Who pray out of curiosity
d. Who prays as enlightened

**Practical Lesson:** After getting Birth, As per our upbringing and company. we start developing our behavior/nature, and while living in this world either

a. We live only for worldly achievements
b. We live in fear of future, society, and uncontrolled circumstances
c. We live with curiosity to unfold the secrets of Life
d. We live as an enlightened soul.

We need to carry out our analysis, find out in which category we fall in? And just like a software update on your cell phone or PC, Upgrade yourselves to the next level.

**3. Visarjan (Immersion)**

Depending on the days, after praising Lord Ganesha for 1.5 days, 3 Days, 5 Days, 7 Days or 10 Days - After Uttar Pooja, it's time to immerse Ganesha's Idol in Water. This Visarjan is celebrated with Dhol-Nagara, nowadays with DJ where devotees dance and bid adieu to their favorite deity with a Promise – Ganpati Bappa Morya – Pudhchya Varshi Lavkar Yaa. (Come back early next year oh my Lord)

**Practical Lesson –** I strongly feel that it is one of the very important lessons in our life. This stage signifies that even when God appears in front of us in mortal form, he has to leave this world. Even we don't know for how many days we will live, it may end in lesser or more than 1.5, 3, 5, 7, 10 seconds, minutes, days, months, years. We all are going to perish some or the other day. It is important to bid adieu this world with peace and happiness. My spiritual master used to quote "Panda Ae Maran Vele, Mubaaraq Koi Koi". Very few people in this world get congratulations at the time of death - congratulations - because one has accomplished the task assigned to it. Those who serve the purpose of life only they can celebrate death too and nobody else.

Let us not only celebrate this festival, rather let's learn from it. Every person goes through these three stages of Creation, Devotion, and Immersion but not every person grows through it. Let us make this festival a reason to grow. Let's manifest Almighty Lord Ganesha in our Mind, Heart, and Soul which will let us realize God everywhere - in everything.

Author: Amit Chavan (Mumbai)

मांडणी आणि संकलन सहाय्य:
आशिष नगरकर

मुद्रित शोधन:
डॉ. सुजाता महाजन

मुखपृष्ठ आणि मांडणी:
अमोल श्रीपाल

रहे ना रहे हम:
प्रसन्न जोगळेकर

## "एक आगळा स्नेह"

"भाऊसाहेब मलाही येईल का हो तुमच्यासारखं चित्र काढता?" माझ्या न कळत्या वयातला तो निरागस प्रश्न. "हो येईल की. त्यात काय मोठंसं? "भाऊसाहेब अर्थात श्री. वसंत परचुरे - म्हणाले.

आमच्या घराशेजारीच त्यांचा पामार्ट नावाचा स्टुडिओ होता. त्यांचे स्नेही श्री. मायदेव त्यांचे धंद्यातील भागीदार होते. सिनेमांची पब्लिसिटी म्हणजे पोस्टर्स, होर्डिंग्ज वगैरे करण्याचा व्यवसाय होता. भाऊसाहेब मोठमोठ्या नट-नटांची अगदी लाईफ-लाईक पोट्रेट्स मोठ्या कॅनव्हासेसवर करीत आणि मायदेव त्यांचं लेटरिंग करीत. तो त्यांचा हातखंडा! हिंदी चित्रपटाच्या क्षेत्रात ते दोघे आघाडीवरचे आर्टिस्ट होते.

या 'पामार्ट 'स्टुडिओत माझं लहानपण गेलं. मला चित्रे काढण्याचं वेड होतं. आश्चर्य म्हणजे या दोन 'ज्येष्ठ' मित्रांनी त्याला खतपाणी घातलं. मी त्यांची छोटी मैत्रीण होते जणू. १९४२-४३ साली या शिवाजी पार्क रस्ता 3 रा येथील जयवंत सदन उर्फ काळे बंगला या बिल्डिंगमध्ये माझे आई-वडील आणि परचुरे, मायदेव एकाच वेळेस आले शेजारी म्हणून. मात्र ही जागा केवळ त्यांनी स्टुडिओ साठी वापरली.

"तू इथे रांगत येत होतीस माहितीये का तुला नकटे?" असं भाऊसाहेब म्हणत. मायदेव म्हणत, "तुझं बारसं जेवलोय बरं आम्ही!" या वास्तूचा मला प्रचंड ओढा होता. सकाळी नऊच्या सुमारास ते दोघे स्टुडिओत येत. लगेच कोपऱ्यावरच्या इराण्याकडून चहा येई. त्यानंतर काम सुरू होई. बाहेरच्या खोलीत मोठ्या खिडकीशी बसून एक बोर्ड पुढ्यात घेऊन ते स्केचेस करीत. बाजूला नट-नट्यांच्या फोटोंचा खच पडलेला असे. चित्रपटाच्या विषयाला अनुसरून ते अचूक फोटो निवडून वॉटर कलर्समध्ये अगदी बरोबर स्केलमध्ये लेआउट करीत. प्रमुख कलाकारांचे मोठे चेहरे मग मागे दुय्यम कलाकार. चित्रपटाला साजेसा 'टाईप' घेऊन मायदेव सुरेख लेटरिंग करीत. हिंदी, इंग्लिश नि उर्दूमध्ये. मग ते स्केच घेऊन १०-१२' कॅनव्हासवर त्याचं ऑइल्समध्ये फायनल पोस्टर केलं जाई. मी तहान-भूक विसरून टक लावून ते पहात राही. भोचक प्रश्नही विचारत राही.

"इथे मीनाकुमारी बारीक दिसतेय. पण फोटोत तर जाडी दिसते." इति मी. मग शांतपणे भाऊसाहेब उत्तरत, "अगं, निर्मात्यांना नट-नट्या अशाच दिसायला लागतात, त्याला इलाज काय?"

माझी आई म्हणे, "उगीच त्यांना प्रश्न विचारून भंडावू नको. त्यांना काम करू दे." पण भाऊसाहेब कधीही मला 'घरी जा' असं म्हणत नसत.

इथंच मला चित्रकलेचं बाळकडू मिळालं. मी एकेक फोटो समोर ठेवून कॉपी करायचा प्रयत्न करायचे. माझा हात चांगला वळायचा. पुढे पुढे मी पेन्सिल ड्रॉईंग अगदी शेडिंग करून करायला शिकले. मायदेवांकडून लेटरिंगचे धडे घेऊ लागले. मी मनाशी ठरवून टाकलं, की मी जे.जे.स्कूल ऑफ आर्ट्सलाच जाणार. पुढे मी जे.जे.ला गेलेही ठरल्याप्रमाणे. त्याचं श्रेय अर्थात या दोघांना जातं!
पामार्ट ही एक इन्स्टिट्यूटच होती. सकाळी नऊ वाजल्यापासून संध्याकाळी सात वाजेपर्यंत इथे चित्रपट व्यवसायातील अनेक मातब्बर मंडळी येत. दिग्दर्शक निर्माते, नट तसेच पब्लिसिटी प्रमुख हे सर्व पोस्टर्स पाहण्यासाठी, नेण्यासाठी येत असत. त्यात गुरुदत्त, हेमंतकुमार, किशोरकुमार, नाना पळशीकर, ओ. पी. नायर सारखे मान्यवर लोक असत. मग त्यांना पाहण्यासाठी बाहेर गर्दी जमे. गुरुदत्त त्यांचा जवळचा मित्र होता. तसाच किशोर कुमार. त्याची लाल कन्व्हर्टिबल घेऊन तो येत असे. पण गल्लीच्या टोकाशी पार्क करून यायचा. रंगीबेरंगी शर्ट घालून, विस्फारलेले केस अशा अवतारात गाणी गुणगुणत तो येई आणि मागे मुलांची गर्दी. गाडी लांब पार करण्याचं काय प्रयोजन होतं हे मात्र कधी कळलं नाही. तो आला, की तासभर तरी असायचा. नाना पळशीकरांची तर माझी दोस्ती होती. त्यांचा 'कानून' हा सस्पेन्स सिनेमा पाहून मी त्यांच्या कामावर खूष होते. ते कॅरेक्टर ऍक्टर म्हणून गाजले होते. हा गृहस्थ अतिशय साधा- डाऊन टू अर्थ आणि बोलघेवडा होता. ते अगदी रंगवून आपले अनुभव सांगत. भाऊसाहेब माझं दैवत होतं पण त्यांची एक वाईट सवय मला त्रास देई. ते सारखे पान खात.

मी म्हणे, "तुम्ही पान खाणं सोडा. त्याने दात किती खराब होतात, ओठ रंगतात".
ते म्हणत, "अगं, पान खाल्लं, की मला काम करण्यासाठी हुरूप येतो. हात अधिक सफाईदार होतो आणि काय ग, तुझे पप्पा नाही का दिवसभर चिरूट ओढत? त्यांना लेखनासाठी मिळणारी ती चालना आहे."

मला ही गोष्ट पटली नाही. पण मी निरुत्तर मात्र झाले.

हिंदी चित्रपट पाहण्याचं तेव्हा मला कधीच वेड नव्हतं पण त्यातली गाणी फारच आवडत. तेव्हा शेकडो गाणी पाठ होती. मायदेवांना शेरशायरी, गझल हे प्रकार आवडत. त्यांना उर्दू समजत असे. साहिर लुधियानवीच्या गीतांवर ते फिदा होते. 'तो खरा कवी आहे फक्त पोटापाण्यासाठी तो हिंदी गाणी लिहितो' असं ते म्हणत. ओ. पी.नायर त्यांचा मित्र म्हणून त्यांचं संगीत त्यांना आवडे आणि आशा भोसलेचा आवाज. मी मायदेवांप्रमाणे आशाच्या गाण्यांची वेडी होते पण भाऊसाहेब लताबाईंचे भक्त. आमची त्या बाबतीत भांडणं होत, कोण श्रेष्ठ यावरून.

पावसाची संततधार लागली, की आमच्या शाळेला सुटी मिळे. मग दिवस स्टुडिओत घालवायला मिळे. मायदेव मला 'लेटरींगचे' धडे देत. पुढे जे.जे.ला गेल्यावर हे ट्रेनिंग उपयोगी पडलं. रोमन टाइम्स रोमन फोलिओ, ग्रोटेस्क, काही टायटॅलिक टाइप्स - सफाईदार, स्टायलिश दिसत- हे टाइप्स मी कमर्शियल आर्ट्सला जाण्याआधीच शिकले होते. भाऊसाहेब कला कधीही शिकलेले नव्हते परंतु ते हाडाचे चित्रकार होते. जेन्युइनली टॅलेंटेड असे आर्टिस्ट. त्यांच्या छोट्याशा स्केचमध्ये सुद्धा साधना, वहिदा, मीना कुमारी, अशोक कुमार, शम्मी कपूर हे कलाकार हुबेहूब ओळखू येत. भाऊसाहेबांचा पेहराव साधा. धोतर कुडता. दिवसभर रंगाशी खेळूनही कपडे स्वच्छ पांढरे कसे दिसतात हे मला न उलगडलेलं कोडं होतं. चित्र काढायला बसले की प्रथम चष्मा शोधीत. कानावर पेन्सिल नि तोंडात पान ठेवून ते भराभर स्केचेस करीत. बोलता-बोलता एक 'मिनी पोस्टर' तयार होई. मग निर्मात्याचं अप्रूव्हल मिळालं. तिथे मोठ्या कॅनव्हासवर कॉइल्समध्ये काम करीत. सारंच अजब होतं! माझ्या या मित्राबरोबर दोन तीन प्रीमियर्स पाहिल्याचं आठवतं. 'बीस साल बाद' ला तर आमच्या पुढच्या रो मध्ये वहिदा रहमान, हेमंत कुमार नि त्यांची पत्नी होते. 'वो कौन थी' पाहिला तेव्हा साधना नटी अगदी जवळून पाहिली. तेव्हा चित्रपटापेक्षा प्रत्यक्षात अधिक सुंदर वाटली होती! हा अनुभव लहानपणी अगदी थ्रिलिंग होता!

माझ्या कॉलेजच्या दिवसात आमच्या मैत्रीत एक मोठा फरक जाणवला तो म्हणजे हे दोघे आर्टिस्ट माझ्याशी समवयस्क असल्याप्रमाणे वागू, बोलू लागले. आमच्या वयाचं बंधन जणू दूर झालं होतं. मी काय नवीन टेक्निक्स शिकते याचं त्यांना कुतूहल होतं. आमचे आवडते चित्रकार एम. एफ. हुसेन, कृष्णाजी आरा, बेंद्रे यांची एक्जीबिशन्स 'जहांगीर आर्ट'मध्ये पाहून आल्यावर आमची त्याविषयी डिस्कशन्स होत. मात्र मॉडन आर्टचा विषय निघाला की दोघेही चिडून बोलत, "कोणीही उठतो नि प्रदर्शन भरवतो, लायकी असो वा नसो. आधी अभ्यास करा नि प्रयोग नंतर करा म्हणावं!" मायकल एँजेलो नि दा व्हींशी ही त्यांची दैवतं होती. आमच्या कॉलेजच्या लायब्ररीत व्हॅन गो, मोने, म्याने आदी प्रभृतींची सुंदर पुस्तकं होती, पण ती फक्त रेफरन्ससाठी असत याचं फार वाईट वाटे. मग अमेरिकेत आल्यावर आर्टवरची खूप पुस्तकं विकत घेतली आणि त्यांना वेळोवेळी कळवलं. त्यांना आनंद झाला.
मी पुढे अमेरिकेत, काही वर्षे कॅनडात असताना 'साईन पेंटिंग'ची कला शिकले आणि साईन आर्टिस्ट म्हणून काम केलं. गोल्ड लिफ आणि स्क्रिप्ट पेंटिंगमध्ये स्पेशलायझेशन केलं, या गोष्टीचा माझ्या या मित्रांना कोण अभिमान वाटला! माझं आर्ट स्कूलचं शिक्षण संपवून मी अमेरिकेला आले त्याआधी भाऊसाहेबांना ही न्यूज कळली तेव्हा ते फार नाराज झाले.
ते तडक उठून माझ्या आईकडे आले. म्हणाले,"तुम्ही या चिमुरडीला या वयात एवढं सातासमुद्रापलीकडे कसं काय पाठवताय? तेही एकटीला? लग्न ही ती तिथेच करणार म्हणते (माझं लग्न श्रीकांतशी ठरलं

होतं नि तो तिथे शिकत होता) आम्ही तिचं लग्नही नाही पाहणार. हे कसं काय?" त्यांचे डोळे भरून आले.

जाण्यापूर्वी मी त्यांना नमस्कार करण्यासाठी स्टुडिओत गेले तर दोघांच्याही तोंडून शब्द फुटेना. भाऊसाहेबांनी धोतराच्या सोग्याने डोळे पुसले आणि दोघांनीही पाठीवरून मायेचा हात फिरवला. यातच सारं आलं. पुढे छोट्या पल्लूला घेऊन भारतात गेले तेव्हा ती रांगती होती. एका सकाळी आमचा उंबरठा ओलांडून ती चक्क स्टुडिओच्या दाराशी गेली. जवळच भाऊसाहेब काम करीत बसले होते त्यांनी चटकन तिला उचलून घेतलं नि म्हणाले, "मायदेव, पाहिलं का? आपली छोटी लीना आलीय!"

अमेरिकेत स्थाईक होऊन आता युगं झाली. माझे हे दोन्ही मित्र आता या जगात नाहीत. भाऊसाहेबांनी माझं कौतुकानं केलेलं वॉटर कलर स्केच माझ्या डेस्कवर अजून आहे. त्याच्याकडे नजर टाकली की जुन्या आठवणी जाग्या होतात नि डोळे ओलावतात. अशी मैत्री मागून मिळत नाही, त्यासाठी मागील जन्मी केलेलं पुण्य गाठीशी असावं लागतं!

लीना घारपुरे
नेपरव्हिल

टंकलेखन
विपुला अधिकारी

## २०२० – सप्टेंबर ते जानेवारी दिनदर्शिका

| | | |
|---|---|---|
| १७ **ऑक्टोबर** | **आश्विन शु. १, प्रतिपदा समाप्ती** १०. ३९ | **घटस्थापना, शारदीय नवरात्रारंभ** |
| २५ **ऑक्टोबर** | आश्विन शु. १० दशमी समाप्ती २२. ३१ | दसरा, विजयादशमी |
| **३० ऑक्टोबर** | आश्विन पौर्णिमा | कोजागिरी पौर्णिमा |
| **११ नोव्हेंबर** | **आश्विन कृ. ११** | **वसुबारस** |
| **१४ नोव्हेंबर** | **आश्विन कृ. अमावस्या** | **लक्ष्मीपूजन** |
| **१५ नोव्हेंबर** | आश्विन शु. १, प्रतिपदा १९.३७ पर्यंत | बलिप्रतिपदा, दिपावली पाडवा |
| **१६ नोव्हेंबर** | **कार्तिक शु. २** | **भाऊबीज** |
| **२६ नोव्हेंबर** | **कार्तिक शु. द्वादशी** | **चातुर्मास समाप्ती, तुळशी विवाहारंभ** |
| **२९ नोव्हेंबर** | **कार्तिक पौर्णिमा** | **त्रिपुरी पौर्णिमा, तुळशी विवाह समाप्ती** |
| **२५ डिसेंबर** | **मार्गशीर्ष शु. ११** | **नाताळ** |
| २९ डिसेंबर | मार्गशीर्ष शु.पौर्णिमा | श्रीदत्त जयंती |
| **१४ जानेवारी २०** | पौष शु. २ | **मकरसंक्रांती** |

**वरील दिनदर्शिका शिकागोच्या स्थानिक वेळेनुसार असल्याने काही सण भारतीय कालनिर्णयापेक्षा वेगळे आहेत ह्याची कृपया नोंद घ्यावी.**

**संदर्भ: कालनिर्णय, दाते पंचांग**

**वर्षा रा. विसाळ**

**ज्योतिष विशारद**

# २०२० महाराष्ट्र मंडळ शिकागो कार्यक्रम

**जानेवारी**

**एप्रिल**

**मे**

**जून**

**जुलै**




**जुलै**

**ऑगस्ट**

## २०२० महाराष्ट्र मंडळ शिकागो कार्यक्रम

**ऑगस्ट**

**सप्टेंबर**

**सप्टेंबर**

**ऑक्टोबर**

**नोव्हेंबर**

# Helping generations *achieve their goals.*

Since Ameriprise Financial was founded back in 1894, we have been committed to putting clients first. Helping generations plan for the expected and unexpected.

As an Ameriprise financial advisor, I remain true to our vision of always putting clients' needs first. Discover how you can benefit from the strength of a global leader and the heart of a one-to-one relationship.

**Narayan Athanikar**
**MS, CIMA®, CRPC®**
*Financial Advisor*
*Vice President*

**630.762.6538**
3 N 2nd St, Ste 200
St. Charles, IL 60174
narayan.athanikar@ampf.com
ameripriseadvisors.com/narayan.athanikar
CA Insurance #0F60740

Ameriprise Financial | Be Brilliant.

Ameriprise Financial Services, LLC. Member FINRA and SIPC.
© 2020 Ameriprise Financial, Inc. All rights reserved.

## महाराष्ट्र मंडळ शिकागो - गणपती दर्शन

## महाराष्ट्र मंडळ शिकागो - गणपती दर्शन

## महाराष्ट्र मंडळ शिकागो - गणपती दर्शन

## पंडित जसराज जी यांना निरोप

भारतीय शास्त्रीय संगीतातील एक दिग्गज, पंडित जसराज आता आपल्यासोबत नाहीत. न्यू जर्सी येथील त्यांच्या घरी हृदयविकाराच्या आजाराने त्यांचे वयाच्या नव्वदाव्या वर्षी (ऑगस्ट १७, २०२०) निधन झाले. जरी ते देहाने आपल्याबरोबर नाहीत, परंतु लाखो भारतीय शास्त्रीय संगीत रसिकांच्या हृदयात त्यांचा वारसा जिवंत राहील. जेव्हा शास्त्रीय संगीताचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा पं. जसराज यांना त्यांच्या योगदानाबद्दल, विशेषतः भारतीय शास्त्रीय संगीत पश्चिमेकडे लोकप्रिय करण्याबद्दल त्यांचे स्मरण केले जाईल.

मला त्यांना वैयक्तिक पातळीवर बऱ्याच वेळा भेटण्याचा बहुमान मिळाला आणि त्यांनी माझ्या घरीदेखील दोन वेळा भेट देण्याची कृपा केली. ते खूप प्रसिद्ध, अत्यंत आदरणीय संगीतकार आणि शिक्षक होते. तरीही नेहमीच त्यांच्याबरोबर राहताना आणि त्यांच्याशी बोलताना मला नेहमीच मोकळेपणा वाटत असे.

मला एक घटना आठवते, जून,२००१ मध्ये डॉ. प्रेम खिलनानी आणि त्यांचा मुलगा विजय खिलनानी यांनी मिशिगन येथील ओकलँड युनिव्हर्सिटी सभागृहात त्यांची मैफिल आयोजित केली. कार्यक्रमाच्या आदल्या रात्री, मला त्यांच्याबरोबर डॉ.खिलनानी यांच्या निवासस्थानी जेवायला बोलवले होते. संभाषणादरम्यान त्यांनी नमूद केले, की विमान उड्डाणात त्यांची पेटी (साथीचे वाद्य) खराब झाली आणि त्यांना मैफिलीसाठी पेटीची गरज आहे. मी म्हणालो, की माझ्याकडे बऱ्याच पेट्या आहेत आणि मी त्यांना माझ्या घरी येण्याची आणि त्यांना जी आवडेल ती हार्मोनियम/पेटी निवडण्याची विनंती केली. डॉ.खिलनानींच्या घरापासून मी फक्त पाच मिनिटांच्या अंतरावर राहत होतो. रात्रीच्या जेवणानंतर ते माझ्या घरी आले. मी त्यांना काही हार्मोनियमस/पेट्या दाखवल्या आणि म्हणालो, कृपया तुम्हाला जी पाहिजे ती घ्या. त्यांना एक हार्मोनियम/पेटी आवडली. ती पाकराशी स्केल चेंजर हार्मोनियम होती. ते सहज हसत म्हणाले "तू पूर्वी जे बोलला होतास ते पुन्हा सांगशील का?" मला त्यांच्या प्रश्नाचा खरा अर्थ समजू शकला नाही आणि म्हणालो, “क्षमस्व, मला नक्की आठवत नाही. कृपया मला आठवण करून द्या.” थोडेसे गंभीर होऊन ते म्हणाले, "आपण म्हटले होते, आपल्याला जे वाद्य आवडेल ते घ्या. तर, मी ही हार्मोनियम घेऊ आणि माझ्याकडे ठेवू शकतो? तुम्हाला माहीत आहे की ती खूप महाग आहे". मी म्हणालो “पंडित जी, तुम्ही निश्चितपणे घ्या. तुम्ही माझ्या घरी आलात हीच माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे.”

ते मोठ्याने हसले आणि म्हणाले "मी फक्त विनोद करीत होतो. पुढील वेळी, दोनदा विचार करा आणि आपण एखाद्याशी बोलतो तेव्हा योग्य शब्द वापरा. आपण काय म्हणतो त्याबद्दल ते आपल्याला जबाबदार धरू शकतात." विनोदपूर्ण पद्धतीने त्यांनी मला एक अद्भुत धडा दिला आणि त्यांनी दिलेल्या या मैत्रीपूर्ण सल्ल्याने मला समाधान वाटले.

पंडित जसराज जी' त्याच्या सुंदर आणि मोहक संगीताद्वारे नेहमीच जिवंत राहतील आणि त्यांची आठवण कायम राहील.

राजन सचदेव, **Phd. Music Plainfield, IL**

अनुवादक - रवी बामणे

# कृतज्ञता

कुणा न कुणाच्या त्यागावरच उभे राहतात  कुणा न कुणाच्या स्वप्नांचे इमले !
स्वप्नपूर्तीच्या धुंदीत विसर पडतो आपणाला हे सारे कसे बरे जमले?

अंधारात चाचपडत होतो तेव्हा कोणी दिली साथ?
अडखळला पाय तेव्हा कोणी दिला हात?
कोण झाले आपल्यासाठी दिव्याची वात?
हे प्रश्न विचारावे कधी डोकावून अंतरंगात!!

मन घट्ट करून कोणी सहन केले आपल्या विचित्र वागण्याला?
चुका पोटात घेऊन कोणी जपले आपल्या स्वाभिमानाला?
कोणी दिली वेगळी व्याख्या समजूतदारपणाला ?
साऱ्या गुण-दोषांसह कोणी स्वीकारले आपल्यातील माणसाला?

आपण दिनक्रम करत गेलो त्यांना गृहीत धरत गेलो...
तेही दिनक्रम करत गेले आपल्यासाठी झिजत गेले...!
आपण आयुष्य जगले जगलो,  खूप काही कमावले
त्यांनी मात्र आपल्यासाठी त्यांचे मौल्यवान क्षण गमावले..!

आज हळव्या क्षणी याची जाणीव होताना...
आपल्या 'आज' चे  श्रेय त्यांना थोडे देताना...
विचार करा खरंच काय चुकत गेले?
त्यांचे निरपेक्ष प्रेम करणे की आपले प्रेमाने अपेक्षा करणे??

म्हणूनच...
कुणा न कुणाच्या त्यागावरच उभे राहतात  कुणा न कुणाच्या स्वप्नांचे इमले!
स्वप्नपूर्तीच्या धुंदीत विसर पडतो आपणाला हे सारे कसे बरे जमले?

- विजय मुळीक

# शब्दकोडे

संकलन - अभिजित रायरीकर

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | | 3 | | 4 | | 5 | | 6 |
| | | | | | | | | | | |
| 7 | | | | 8 | 9 | | | 10 | | |
| | | | | | | | | | | |
| 11 | | 12 | | 13 | | 14 | | 15 | | |
| | | 16 | | | | 17 | | | | |
| 18 | | | | 19 | 20 | | | 21 | | 22 |
| | | | | | | | | | | |
| 23 | | 24 | | 25 | | 26 | | 27 | | |
| | | | | | | | | | | |
| 28 | | | | | | 29 | | | | |

उभे शब्द

1. पन्नासला पाच कमी!!

2. दौड

3. डावखुरा

4. पोटशूळ

5. शिस्तप्रिय

6. छाननी करणारा अधिकारी

9. वडील, पिता

12. डोळे

13. चिंतन

14. धोबी, परीट

15. चिवट, हेकट

18. गर्जना (उदा. ढगांची)

20. शिल्लक असलेले, रद्द केलेले

22. कमरेभोवती घालायचा पट्टा

24. पाणी ओढण्याचे दोन चाकांचे साधन

25. खाडी

26. लिहिणे

27. शेत, कुरण, राबता

आडवे शब्द

1. पक्ष, अर्धा महिना

4. खरे नसलेले, पण खरे असल्यासारखे भासवणारे

7. हलकी थप्पड

8. सुकुमार, देखणा

10. भुट्टा, तुरा

11. घर

13. सुसर, दहावी रास

15. उत्तराधिकारी

16. निग्रह, संगीतातील एक राग

17. स्थलांतरित व्यापारी वस्तूंवरील कर

18. प्रस्थान, जाणे

19. यमाचे वास्थव्यस्थान

21. कठीण, घट्ट

23. जयघोष

25. अलिकडच्या बाजूचे

27. माकड

28. तजेलदार

## कमलः कमलात् जातः

महाकवी कालिदासाचे नाव माहीत नसलेला मनुष्य महाराष्ट्रात किंवा संपूर्ण भारतात असणे शक्यच नाही. कालिदासाच्या जीवनाबद्दल मात्र फारशी माहिती नाही. त्यामुळे त्यांच्याविषयी बऱ्याच आख्यायिका प्रसिद्ध आहेत.

कालिदासाला एक जगावेगळा छंद होता. त्यांना सामान्य माणसासारखे रूप धारण करून भारतवर्षभर प्रवास करायला फार आवडायचे. ही लघुकथा याच छंदाविषयी आहे.

एकदा कालिदासांनी असाच वेश पालटून प्रवास करताना दक्षिण भारतातील एका प्रांताला भेट दिली. त्या प्रान्ताचा राजा कालिदासाचा परम मित्र होता. कालिदासाने मात्र त्याला न सांगता, त्याच्या महालात न राहता एखाद्या सामान्य माणसाप्रमाणे एका नर्तकीच्या घरी राहण्याचे ठरविले.

एके रात्री त्या नर्तकीने कालिदासाला सांगितले, की महाराजांनी एक प्रहेलिका समस्यापूर्तीसाठी मांडली आहे. जो ती पूर्ण करू शकेल त्याला अमाप धन संपत्ती आणि जडजवाहीर देण्यात येईल. कालिदासाने कुतूहलाने तिला 'प्रहेलिका काय आहे' हे विचारले .

नर्तकी म्हणाली, की पहिली ओळ आहे,

"कमलः कमलात् जातः, श्रूयते ना दृश्यते "

(कमळातून कमळ उगवते असे ऐकिले आहे, पण पाहिले मात्र नाही)

कालिदास एका क्षणात म्हणाला

सुन्दरी,

"तव मुख कमलात्

नेत्र कमलः जातः,

श्रूयते एवं दृश्यते."

(सुंदरी, तुझ्या मुख कमळातून नेत्र कमळ उगवले असे ऐकलेले आहे आणि पाहतो पण आहे)

नर्तकी रात्री कालिदास जवळ झोपलेली असताना तिच्या मनात विचार आला, की जर आपण स्वतः राज्यसभेत महाराजांसमोर समस्यापूर्ती केली तर आपल्याला पूर्ण पुरस्कार मिळेल.

त्या क्षणी तिने कालिदासाचा गळा दाबून जीव घेतला.

सकाळी तिने राज्यसभेत सर्वांसमोर समस्या पूर्ण केली. महाराजांनी प्रसन्न होऊन तिला धन-धान्य आणि दागिने देऊन तिचा सत्कार केला.

महाराज म्हणाले, "नर्तकी, तू खूप सुंदर आहेस तरी तुला ही उपमा सुचणे अशक्य आहे. कारण तू स्वतः एक स्त्री आहेस.

या जगात अशी अलौकिक कल्पना शक्ती असणारी फक्त एकच व्यक्ती आहे, ती म्हणजे माझा मित्र महाकवी कालिदास!"

त्यांनी नर्तकीला, 'कालिदास कुठे आहे?' असे विचारल्यावर तिने रडत रडत सर्व काही सांगितलं.

महाकवी कालिदासाच्या संबंधात "उपमा कालिदासस्य" प्रमाणेच "कमलः कमलात् जातः" ही ओळ पण अजरामर झाली.

सुभाष वाईकर

अनिकेत सावंत

## Apartment Living as an ABCD

This past spring, every time I felt a craving for some caffeine, I'd reach for a coffee pod and brew a cup of morning coffee from my Keurig. Since coming home in March, I now reach for some ginger, some tea powder, and a pot. Though the change is subtle, there have been many such cultural differences I have noticed from living alone to living back at home.

This fall, I will move into my very first apartment. As a 20-year-old, apartment living is both liberating and terrifying. I am excited to live with my friends and enjoy some of the freedoms that apartment life has to offer me, as I've spent the last two years living in a dorm. However, I am also nervous for all the responsibilities it holds, and I'm worried about how different my life will be.

For the past almost six months, I have been living at home due to the pandemic shutting colleges down back in March. I've gotten used to life at home once more, with my mom making "poli-bhaaji" for meals, and my dad waking me up in the mornings with a hot cup of chai waiting for me in the kitchen. These are the luxuries that I am aware I won't experience when I'm on my own once again.

As I began packing my boxes and bags to return to campus, my mom started suggesting all the things I bring with me to eat frozen "paraatha", garam masala, rice, lentils/beans, and other spices to add to my cooking. This made me wonder -- what will I cook? I love eating Indian food, but as an ABCD (American Born Confused Desi), when I go into the kitchen my mind somehow defaults to cooking pasta and making grilled cheese. I started wondering, why is there this disconnect? Though I associate my food-loving habits with Indian food, I somehow associated my food-making habits with American foods.

I decided that I wanted to bring parts of my culture to my apartment with me, but in a realistic fashion. By bringing ingredients like garam masala and chai powder I give myself the option to have those foods some days, but I will also have coffee and pasta sauce on hand for the days when I am craving something different!

ABCD's tend to have a tough time with their identities: for some, it is a matter of showing one side in some situations and showing another side in others. For others, it is a matter of having both sides exist in harmony in every context. Each person's way of showing their dual identities may differ, but we must all remember never to forget our heritage. When we enter new situations, we should also bring with us our past, our culture, and our heritage. They are a part of us, and we should display those traits proudly.

As I packed up all the stuff for my kitchen, I made sure to create space in the box for some tea powder and a chai pot. This is one change I will be sure to bring with me to my new place, as I begin my journey into ABCD adulthood.

Anushree Rayarikar

## मनातले काही.....

दैनंदिन जीवनाकडे लक्ष गेले, की मला बाल्यावस्थेत श्रवण केलेली एक हत्ती आणि सात आंधळे ही कथा आठवते. कथेनुसार ज्यांनी हत्तीच्या कानांना स्पर्श केला ते म्हणाले हत्ती सुपासरखा, ज्यांनी हत्तीच्या पायांना स्पर्श केला ते म्हणाले की हत्ती खांबसारखा ..इत्यादि. कथेतील महाकाय हत्ती विश्वाच्या विशालतेचे प्रतीक तर आंधळे हे प्रतीक जनसमान्यांचे. थोडक्यात प्रत्येकाला त्याच्या आवाक्यानुसार विश्वदर्शन घडते.

विसाव्या शतकातील विज्ञानाची भारती तर विस्मयकारी आहे. कोठे पायाची दुचाकी तर कोठे चांद्रयनातील सफर!

भारताच्या राजधानीत रात्री सुखेनैव हात पाय पसरावेत आणि सकाळी जाग आल्यावर लंडनमध्ये ब्रेकफास्ट करावा, ही तर अल्लाउद्दीनच्या जादूच्या दिव्यालाच शोभण्यासारखी गोष्ट आहे. यंत्रमानवाची निर्मिती करून टेस्टटयूब बेबीजना जन्माला घालून माणसाने विज्ञानाचा उच्चांक गाठला आहे. पण मदोन्मत्त मानवाने आसुरी आनंद मिळवण्यासाठी प्रथम अण्वस्त्रे आणली. आता करोनासमोर मनुष्य हतबल झाला आहे. असहायतेपोटी प्राणार्पण करीत आहे. आता ईश्वर चरणी शरणागत होण्याखेरीज दुसरा पर्याय उरला नाही. याकरिता श्रद्धेची आवश्यकता आहे.
Faith is something wherein initially you are required to believe what do not see, and the reward is you see what you believe.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर ते संत विनोबा अशी संतांची अखंडित परंपरा या भूमीला लाभली आहे. एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ  अशी विनयशील सहकाराची त्यांची शिकवण आहे. त्यांच्या भक्ति सामर्थ्यामुळे विठ्ठल माझा लेकुरवाळा ही उपाधी श्रीविठ्ठलाला प्राप्त झाली आहे. भक्तीरसाचा हा महिमा आहे. संसारसागरात गटांगळ्या खाणाऱ्या जिवासाठी संतश्रेष्ठ तुकाराम पुनः पुनः परमेश्वराला विनवतात, की बुडती ही जन देखवेना डोळा, म्हणोनि कळवळा येत असे आणि या साठी सुखे घालावे गर्भवासी ही विनवणी श्री विठ्ठलाला करतात. आवघाची संसार सुखाचा करीन आनंदे भरीन तिन्ही लोक असे परमात्म्याला ते आश्वासितात.

पण आपल्या पुस्तकी ज्ञानाने फुगलेल्या तथाकथित पंडितांना भक्तिभावाची महानता कोठून समजणार ? शब्दांची पोपटपंची करणाऱ्या लोकांना वारकऱ्यांचे विठूप्रेम कोठून आकलन होणार? तरी या महाभागांकडे लक्ष न देणे हेच श्रेयस्कर.

भक्तिमार्ग न मानवणाऱ्या लोकांसाठी मग काय करावे बरे ? युगानुयुगे विश्वाला मार्गदर्शक असा एक अमर ग्रंथ म्हणजे श्रीमद्भगवद्गीता ! टॉयनबिज(टॉयम्बी) या जागतिक कीर्तीच्या महान विचारवंताला जेव्हा वार्ताहरांनी विचारले, की आपल्याला एकच ग्रंथ जवळ बाळगण्याची परवानगी असेल तर आपण कोणत्या ग्रंथाची निवड कराल ? त्यावर क्षणाचाही विलंब न करता ह्या विद्वान पंडिताने उत्तर दिले, की भगवद्गीता हा ग्रंथ दीपस्तंभासारखा आहे !

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच ! अशी सिंहगर्जना करणाऱ्या लोकमान्यांना जेव्हा ब्रिटिश सरकारने सहा वर्षांची शिक्षा ठोठावून मंडालेच्या तुरुंगात दीर्घकाळ कैदेत ठेवले, त्या काळात या विद्वान राजकीय नेत्याने जनसामान्यांसाठी श्रीमद्भगवद्गीता अर्थात कर्मयोग या ग्रंथाची निर्मिती केली. या ग्रंथाच्या अखेरीस दशसहस्त्र ग्रंथांची संदर्भ सूची आहे. ही संदर्भसूची पाहूनच या लोकोत्तर पुरुषाच्या विद्वत्तेची कल्पना येते.
सर्व मराठी मंडळीनी तरी कर्मयोग हे गीतारहस्य सदोदित ध्यानी ठेवून कालक्रमणा करावी असे मला नम्रपणे सांगावेसे वाटते.

श्री रामचंद्र अळकुटकर

DRAPER & KRAMER MORTGAGE CORP.

# Gyan Srivastava

Residential Mortgage Lending

- Home Purchase and Refinance Loan Specialist
- Lender Credit Available to Offset Closing Costs
- Cash-out Refinancing Options Available
- Fixed/Jumbo/Adjustable-Rate Mortgages (ARMs)
- No PMI Program
- In-House Underwriting and Closing
- Investment Properties/Second Homes
- Home Equity Lines of Credit (HELOCs)
- FHA/VA/Interest Only
- Quick Turn Times

*Contact me for a low rate quote and a mortgage consultation!*

Mobile: 630-670-1645 gyan.srivastava@dkmortgage.com
Office: 630-268-5447 www.dkmortgage.com/gyan

701 E. 22nd Street, Suite 125 • Lombard, IL 60148

EQUAL HOUSING LENDER

Gyan Srivastava (IL:031.0027115 NMLS:287055) is an agent of Draper and Kramer Mortgage Corp. (IL:MB.0004263 NMLS:2551) is an agent of Draper and Kramer Mortgage Corp. (NMLS:2551) an Illinois Residential Mortgage Licensee located at 1431 Opus Place, Suite 200, Downers Grove, IL 60515, 630-376-2100. IL: Illinois Residential Mortgage Licensee No. MB.0004263 - Licensed by the Department of Financial and Professional Regulation, Mortgage Banking Division, 100 West Randolph, 9th Floor, Chicago, IL 60601, (888) 473-4858. 02970-01 03/2018

## SIMPLIFYING LEGAL PROCEDURES IN INDIA

**MANASI PINGLE**
Advocate & Solicitor
Email : mnpingle@gmail.com
Phone: +91-93222 62270

**Address:**
A-703, Joy Homes, L.B.S. Marg,
Bhandup (West), Mumbai – 400 078

Many Indians who have settled abroad or are working abroad are looking for trustworthy legal advisors to advise and support them on their legal requirements viz. property matters, will, probate, gift deeds, power of attorney, legal documentation in a seamless and professional manner.

Typical challenges pertaining to immovable property matters include understanding the complexity of the paperwork required and procedures to be followed in India.

Areas of expertise:

- Property Matters
  - -Sale / Purchase Agreements
  - -Leave and licence Agreements
  - -Devolution on demise of owner
  - -Transfer of property
  - -Gift deed
  - -Search report
  - -Title certificate
- Will
- Probate
- Power of Attorney
- Cooperative society matters
- Registration of legal documents
- Stamp duty payment
- Notary

| Matters | Common Considerations |
|---|---|
| Buying property | ✓ Conduct a proper background check and give a search report and title verification<br>✓ Proper documentation |
| Letting out premises | ✓ As per the latest circular, registration of leave and licence agreement is mandatory<br>✓ Police verification procedure needed |
| Cooperative society matters | ✓ Nomination and Transfer procedures which are in line with the new bye-laws issued by the Maharashtra Government |
| Transfer of property & Gift | ✓ Transfer of property and the different ways viz. release deed, deed of family arrangement, gift, partition, probate of will. It is crucial to decide the correct approach based on the circumstances |
| Selling property | ✓ Getting a fair price for the property and payment of applicable taxes both are critical<br>✓ Securing payment and handing over possession in a timely manner with appropriate safeguards |

## बाप्पाशी गप्पा

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ निर्विघ्नम कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा ||

उन्हाळा संपत आला, की पावसाळ्याच्या तयारीला सुरुवात होते आणि त्याचबरोबर घरातील चिमुकल्यापासून सर्वांना गणपती बाप्पाच्या आगमनाची ओढ लागते. गणपती बाप्पा सर्वांच्या मनामध्ये एक उत्साह निर्माण करतो. मराठी शाळेतील मुलं सुद्धा यावर्षी गणपती बाप्पाच्या आगमनाची उत्सुकतेने वाट बघत आहेत. बाप्पाचं स्वागत कसं करायचं हा प्रश्न सर्व चिमुकल्यांच्या तसेच मोठ्यांच्या मनात क्षणोक्षणी घोळत असतो.

२०२० हे वर्ष आपल्यापुढे एक मोठं **COVID-.19** नावाचं संकट घेऊन आलं. या संकटाला आपण सर्वच सामोरे जात आहोत आणि अशा वेळेला आपल्या घरी बाप्पा अर्थातच विघ्नहर्ता येऊन या विघ्नाचा नाश करेल अशी प्रार्थना सर्वजण करत आहोत. शाळेतील प्रत्येक मुलाने बाप्पाशी या वर्षी मनसोक्त गप्पा मारायच्या असं ठरवलं आणि त्यातूनच निर्माण झाली एक कल्पना, की आपण सगळे एकत्र येऊन बाप्पाशी गप्पा मारू या. आपल्या मराठी शाळेच्या उत्साही शिक्षकांनी आणि



श्री रेगे २

एका गणेशा, तुमची कहाणी
तुमचाच महिमा, तुमचीच गाणी
निर्मळ मने, उदकाचे तळे
वेलाचा वृक्ष सोन्याची कमळे
महागणपती वसावा मनी
तुमचाच महिमा, तुमचीच गाणी
पार्वतीने काढला देहाचा मळ
त्यातुन आले जिवंत बाळ
मोठ्या सांबाने तोडले डोके
त्यावरी ताविते हत्तीचे डोके
त्याचे ठेवले नाव गजानन
बालक आहे घेतो दर्शन

श्री रेगे २

महाराष्ट्रात अष्टविनायक
दर्शन त्याचे सुखकारक
पाली गावाचा बल्लाळेश्वर
मोरगावचा मयुरेश्वर
रांजणगावचा महागणपती
थेऊर गावचा श्रीचिंतामणी
सिद्धिविनायक सिद्धटेकचा
गिरिजात्मक लेण्याद्रीचा
व्यास सांगती महाभारत
बाळ गजानन त्यांचा लेखक
वाहन तुझे असे मूषक
सारे करती तुझे कौतुक

श्री रेगे
2020

कार्यकर्त्यांनी बाप्पाच्या स्वागतासाठी अनेक सुंदर कल्पना मांडल्या.

गणपती बाप्पा आपल्या घरी आला, की घरात एक अलौकिक असा उत्साह निर्माण होतो. अशा आपल्या बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी शाळेच्या मुलांमध्ये सुरू झाली आहे. मुलांनी उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये गणपतीची सुंदर चित्रं रेखाटली आहेत आणि शाळेने ती या वर्षी शाळेच्या फेसबुक पेजवरती सर्वांना पाहण्यासाठी अपलोड केली आहेत.

शाळेतील प्रत्येक मुलाने आपापल्या घरात आलेल्या बाप्पाचं दर्शन सर्व मित्र मैत्रिणींना घडवायचे ठरवले आहे. दरवर्षी आपण गणपतीबाप्पाला धूमधडाक्यात वाजत गाजत घरी घेऊन येतो. संध्याकाळी सर्व मित्रमैत्रिणींना बोलावतो आणि आनंदात बाप्पाची आरती करतो आणि आरतीनंतर विशेष ओढ असते बाप्पाबरोबर शेअर केलेली खिरापत प्रसाद म्हणून खाण्याची. पण कदाचित या वर्षी सर्वांना एकत्रित येणं आणि आरती करणं किंवा भेटून किल्ले बांधणं शक्य होणार नाही पण त्याचबरोबर आता **Technology** मुळे आपल्या घरच्या बाप्पाचं दर्शन मुलं सर्व शाळेच्या मित्रमैत्रिणींना झूमद्वारे करून देणार आहेत. इतकेच नव्हे तर, प्रत्येक दिवशी सर्व मुलं मिळून एकत्रित येऊन गणपती अथर्वशीर्ष म्हणणार आहेत.

या वर्षी शिकागो मराठी शाळेतील मुलं एक आगळा वेगळा असा प्रयोग करणार आहेत. महाराष्ट्र मंडळाच्या गणेशोत्सवात मुलं आपल्याला गणपतीची बारा नावं म्हणून दाखवणार आहेत.

चला तर, आपण या सर्व चिमुकल्यांबरोबर विघ्नहर्त्याकडे **COVID-19** या संकटापासून मुक्ती मिळवण्यासाठी आपण सर्व एकत्रित येऊन प्रार्थना करू या.



गणपती बाप्पा, मोरया! मंगल मूर्ती, मोरया!!

प्रिय बाप्पा,
दरवर्षी जेव्हा गणेश चतुर्थी येते, तेव्हा खूप मजा येते! दिवाळी बरोबर गणेश चतुर्थी हा माझा आवडता सण आहे. आम्ही आमच्या कम्युनिटीच्या गणपतीला दहा दिवस न चुकता जातो. आम्हाला बऱ्याच ठिकाणांहून आमंत्रण पण असते. घरी मम्मा खूप काही छान पदार्थ पण करते. दरवेळेस मला छान छान भारतीय कपडे घालायला मिळतात. मागच्या वर्षी तर आमच्या थेट शेजारीच गणपती होता! या वर्षी गणेश चतुर्थी तर एकदम वेगळी असणार आहे. हो मम्मा तरी पन छान पदार्थ करणार आहे आणि आम्ही दरवेळेस भारतीय कपडे घालणार आहोत, पण COVID-19 मुळे आम्हाला कुठे बाहेर जाता येणार नाही. या वर्षी आम्ही घरूनच दररोज पूजा करणार आहोत. या वर्षी मी बाप्पाला प्रार्थना करणार आहे की COVID-19 जाऊ दे, सर्वांना सुख, शांती व समाधान लाभू दे, जगातून वर्ण द्वेष कायमचा नष्ट होऊ दे, आणि बाप्पा सतत माझ्या पाठीशी राहून मला योग्य मार्ग दाखवू दे. आणि मझ्या तर्फे बाप्पाचे विशेष आभार मला एवढे छान कुटुंब आणि एवढे सुंदर आयुष्य दिल्या बद्दल!

गणपती बाप्पा, मोरया! जगावरचा सगळी विघ्ने दूर करण्यासाठी लवकर ये!!!



सौ सुलक्षणा कुलकर्णी
संचालिका . शिकागो मराठी शाळा

# Paneer Do Pyaza

## Ingredients

- Paneer cubed
- Onion Petals
- Thinly sliced onion 1 large 0r 3 medium
- Tomato paste ¼ Cup or 3 medium Tomatoes pureed
- Powdered Spices: Red Chili powder; Coriander Powder; Kitchen King Masala; Kasuri Methi
- Whole Spices: Cinnamon Stick; Bay Leaf; Cardamom pods; Dry Red Chillies
- Cumin Seeds
- Cashew Magaz Paste
- Salt to taste
- Oil
- Cilantro for garnishing

## Method

- Heat oil in a pan. Add whole spices and saute it for a minute.
- Add ginger garlic paste and saute it for a minute. Then add sliced onions and cook till the onions are golden brown.
- Add tomato paste or tomato puree along with powdered spices to the onion mixture. Cook till oil separates from the masala.
- Add cashew magaz paste to the masala and cook it for a minute or two. The masala is going to thicken due to cashew magaz paste. Add water to adjust the consistency of the masala according to your preference (dry or gravy texture).
- Add onion petals in the masala and cook it for two minutes.
- Then add paneer to the masala and cook it for two minutes on low medium heat. (If desired paneer can be shallow fried; then soak in lukewarm water to make it soft ; then add to the masala)

- Transfer the paneer do pyaza to a serving bowl and garnish with cilantro.
- Serve the paneer do pyaza with Paratha or Naan or Jeera Rice.

Enjoy!!

Madhura Joshi

# Vegan Chili

## Ingredients

- 1 ½ tablespoons olive oil (more as needed, if not using nonstick pan)
- 1 large yellow onion, diced
- 4 garlic cloves, chopped finely
- 1 jalapeño peppers, diced
- 2 tablespoons tomato paste

**Spices**

- 2 teaspoons chili powder
- 1 tablespoon ground cumin
- 2 teaspoons dried oregano
- 2 cups vegetable broth
- 1 1/2 tablespoons unsweetened cocoa powder (or raw cacao powder)
- 1 bay leaf
- 1 ½ teaspoons kosher salt, plus more to taste
- Black pepper to taste
- 1 can red kidney beans, drained and rinsed (or any other bean you like)
- 2 large sweet potatoes, peeled and finely diced
- 2 medium diced tomatoes
- 1/4 cup chopped fresh cilantro (optional but recommended)
- 2 teaspoons lime juice, plus more to taste

**Directions**

Heat a large saucepan or Dutch oven on medium-high heat. Add the olive oil, and once it's shimmering, add the onions and season with salt. Stir frequently and cook the onions until a light brown fond start form on the surface of the pan, about 5 minutes. Continue cooking the onions, until they're browned and fully softened, 8- 10 minutes.

Add the garlic, jalapeño peppers, and tomato paste, and cook for 2-3 minutes or until tomato paste is darker in color. If the mixture appears to dry out, add a bit more water and scrape up any browned bits.

Stir in the Spices and stir vigorously for 30 seconds, again adding a spoon of water as needed to prevent drying out.

Pour in the vegetable broth, the cocoa powder, bay leaf, 1 ½ teaspoons kosher salt, black pepper to taste, pinto beans, diced sweet potatoes, and diced tomatoes. Stir well. Bring the chili to a simmer and maintain a rapid simmer for 30 minutes, stirring occasionally and reducing the heat as needed, until the sweet potatoes are fully tender and the chili is thick and almost velvety.

Discard the bay leaf. Stir in the cilantro (if using) and the lime juice. Taste for seasonings.

NOTE: keep in mind that chili always tastes better after it has rested for some time, as the spices will have a chance to mellow out and meld together.

- Savni Nagarkar

## शब्दकोडे - उत्तर

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 पं | ध | 2 र | व | 3 डा | | 4 त | था | 5 क | थि | 6 त |
| चे | | पे | | व | | ड | | ड | | पा |
| 7 चा | प | ट | | 8 रा | 9 ज | स | | 10 क | णी | स |
| ळी | | | | | न | | | | | नी |
| 11 स | द | 12 न | | 13 म | क | 14 र | | 15 वा | र | स |
| | | 16 य | म | न | | 17 ज | का | त | | |
| 18 ग | म | न | | 19 न | 20 र | क | | 21 ट | ण | 22 क |
| ड | | | | | हि | | | | | म |
| 23 ग | ज | 24 र | | 25 आ | त | 26 ले | | 27 वा | न | र |
| डा | | हा | | खा | | ख | | व | | बं |
| 28 ट | व | ट | वी | त | | 29 न | ज | र | कै | द |

# रहे ना रहे हम

## गेल्या काही महिन्यात आपल्याला सोडून गेलेल्या विविध क्षेत्रातील दिग्गजांना श्रद्धांजली!

रॉब गिब्ज (फाईंडिंग निमो, टॉय स्टोरी रचनाकार)
रत्नाकर मतकरी (ज्येष्ठ लेखक, नाटककार)
बासू चॅटर्जी (ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक)
वाजिद खान (साजिद वाजिद संगीतकार जोडीतील एक संगीतकार)
सुशांत सिंह राजपूत (चित्रपट अभिनेता)
कमल शेडगे (मराठी सुलेखनकार)
सरोज खान (ज्येष्ठ नृत्य दिग्दर्शिका)
लीलाधर कांबळी (ज्येष्ठ अभिनेते)
जगदीप (ज्येष्ठ चित्रपट अभिनेते)
एनीयो मॉरिकोने (ज्येष्ठ ऑपेरा, चित्रपट संगीत दिग्दर्शक)
नीला सत्यनारायण (लेखिका, निवृत्त आय ए एस अधिकारी)
सर एव्हर्टन विक्स (ज्येष्ठ विंडीज फलंदाज)
जॉन लुईस (जेष्ठ सामाजिक हक्क विचारवंत)
राम प्रधान (माजी केंद्रीय गृह राज्य सचिव)
इब्राहिम अलकाजी (ज्येष्ठ रंगकर्मी, शिक्षक)
अमर सिंह (माजी नेते)
कॅप्टन दिपक साठे (ज्येष्ठ वैमानिक, माजी वायुसैनिक)
राहत इंदोरी (ज्येष्ठ कवी, शायर, चित्रपट गीतकार)
पंडित जसराज (ज्येष्ठ हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतकार)
निशिकांत कामत (चित्रपट दिग्दर्शक)
चेतन चौहान (माजी भारतीय क्रिकेट फलंदाज)

ASKM
ESTATE SOLUTIONS
You Ask, We Do The Task!

kw INFINITY
KELLERWILLIAMS.
ASK YOUR REALTY PARTNER

Worried about buying or selling properties?

Experienced in dealing in out of State properties

HURRY, BOOK AN APPOINTMENT!

YOU ASK, WE DO THE TASK!

If you have any questions related to property,
ASK SANJAY

SANJAY MARATHE
Real Estate Broker

(630) 915-2970 (Cell #) (630) 778-5800 (Office)
608 S Washington St #100, Naperville, IL 60540
www.askmrealty.com sanjaym@kw.com

Search for homes from cell phone
TEXT: KWS8KPH TO: 87778

d'aprile properties®

ARCHANA PARANJAPE
REALTOR®
(630) 854-9137

arch@daprileproperties.com
www.daprileproperties.com

Your Neighbor Your Realtor

If you have any real estate buying, selling, or rental needs in the Chicagoland and surrounding suburban area, feel free to contact me!

I will be more than happy to help you find your perfect home!

**Archana Paranjape**

**Cell: (630)-854-9137**

**Email: arch@daprileproperties.com**

PICCONY & PATANKAR P.C.
ATTORNEYS AT LAW
WITH OUR BEST COMPLIMENTS FROM PICCONY & PATANKAR, P.C.
AREAS OF PRACTICE
Estate Planning
Taxation
Real Estate Buy and Sale
Family Law
Business Formation
Personal Injury
Traffic Law
Piccony & Patankar, P.C.
1700 North Farnsworth Avenue, Suite 28, Aurora, IL 60505
Phone: 630-820-8877
www.picconypatankar.com

SAVE BIG$$$
PMSInc
Great Rates & No Closing cost Options
Wide variety of mortgage products with great service and support
1
Compare wholesale mortgage rates from multiple banks and lenders
2
No monthly M.I. Mortgage options upto 95% loan to value
3
Get more loan options. We work with multiple banks and lenders.
FREE Consultation
Knowledgeable and Responsive
Ashok Lakshmanan
Mortgage Broker
NMLS#238977
Professional Mortgage Solutions, Inc.
(An Illinois Residential Mortgage Licensee)
NMLS#237990
630.205.8676
1776 Legacy Circle, Ste#107 • Naperville, IL 60563 • Off: 630.717.3600 • Fax: 630.717.3601